# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**(सामान्य प्रशासन शाखा)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१७/११ दिनांक: ३१ ऑक्टोबर २०१७

## नोंदणीकृत पदवीधरांची सूची प्रसिध्द करण्याविषयी

या अधिसूचनेद्वारा संबंधित सर्व पदवीधरांना सूचित करण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत नाव नोंदविण्याकरिता विद्यापीठाच्या पदवीधरांकडून विद्यापीठ अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/निक/१७/३, दिनांक १२ जुलै २०१७ नुसार अर्ज मागविण्यात आले होते. तद्नुसार प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत नाव समाविष्ट करण्यासाठी पात्र ठरलेल्या आणि नोंदवहीत **नोंद झालेल्या पदवीधरांची सूची** विद्यापीठाच्या **www. nagpuruniversity.org** संकेत स्थळावरील **Election - 2017** या **Portal** वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच ज्या पदवीधरांचे अर्ज पदवीधर नोंदणीसाठी अपात्र ठरले आहेत त्या पदवीधरांची सूची अपात्रतेच्या कारणांसह वरील **Portal** वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

ज्या संबंधीत पदवीधरांना वर नमूद सूचीतील पदवीधरांच्या अर्हतेबाबत **आक्षेप** नोंदवायचा असेल, असे पदवीधर मा. कुलगुरूंकडे **बुधवार, दिनांक ८ नोव्हेंबर २०१७** पर्यंत आक्षेप नोंदवू शकतील. आक्षेपांवरील निर्णय **सोमवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०१७** रोजी वरील पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल. आक्षेपांवरील मा. कुलगुरूंचा निर्णय अंतिम असेल.

नोंदणीकृत पदवीधरांनी सूचीतील **नोंदणीक्रमांची नोंद** आपल्याजवळ ठेवावी. कारण नोंदणी क्रमांक नोंदणीकृत पदवीधर गटाच्या मतदार यादीत संबंधितांचे नाव समाविष्ट करण्याकरिता सादर करावयाच्या **FORM-B** मध्ये नमूद करणे अनिवार्य आहे.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव